Estd: 1962
"A++" Accredited by NAAC (2021)
with CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## - :: परिपत्रक :: -

**संदर्भ : शिवाजी वि./आस्थापना पी.जी./२००, दि. ०५/०३/२०२६ रोजीचे परिपत्रक**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम २३ (ख) मधील तरतूदींनुसार आणि मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे - १ यांनी पत्र क्रमांक युएनआय/(१३०/१८) /अधी.३/विशि-१/१९०१३, दिनांक १७/११/२०१८ च्या पत्राद्वारे शासन पत्र क्र. परिनि-२०१८/प्र.क्र.८६/विशि-२, दिनांक ३०/१०/२०१८ च्या पत्रासोबत पाठविणेत आलेल्या महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ एकरूप परिनियम, २०१८ (क्रमांक २) च्या अनुषंगाने शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर मध्ये **संचालक, राष्ट्रीय सेवा योजना** या पदावर मा. कुलगुरू यांच्यामार्फत नामनिर्देशन करावयाचे आहे. तरी यासाठी उपरोक्त संदर्भीय परिपत्रकाद्वारे संचालक, राष्ट्रीय सेवा योजना या पदासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात आले होते.

२०१८ चा एकरूप परिनियम क्रमांक २ द्वारे संचालक, राष्ट्रीय सेवा योजना या पदाकरिता वित्तलब्धी, वय, पदावधी आणि सेवेच्या अटी व शर्ती विहित करण्यात आल्या असून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम २३ (ख) मधील तरतूदींनुसार सदर पदाकरिता अध्यापनाचा किमान एकूण दहा वर्षांचा अनुभव असणाऱ्या, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी म्हणून किमान तीन वर्षांचा अनुभव असणाऱ्या आणि राष्ट्रीय सेवा योजना कृतिकार्यक्रम क्षेत्रामध्ये समाधानकारक कामगिरी पार पाडलेल्या अध्यापकांमधून मा. कुलगुरू यांचेद्वारे नामनिर्देशित करण्याकरिता इच्छुक पात्र अध्यापकांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. सोबत एकरूप परिनियमाची प्रत माहितीसाठी जोडली आहे.

तरी इच्छुक पात्र अध्यापकांनी दिनांक २७/०५/२०२६ ते १२/०६/२०२६ या कालावधीमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in येथील Recruitments - At University या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावा. सदर अर्जाची हार्ड कॉपी (Hard Copy) आवश्यक त्या सर्व साक्षांकित कागदपत्रांसह दि. १७/०६/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत मा. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे नावे विद्यापीठ कार्यालयास पोस्टाने अथवा स्व:हस्ते सादर करावी. फक्त ऑनलाईन पध्दतीने विहित नमून्यामध्ये केलेले अर्ज ग्राहय धरण्यात येतील. अन्य माध्यमातून, अपुरे अथवा आवश्यक कागदपत्राशिवाय सादर केलेले अर्ज तसेच, अंतिम दिनांकानंतर प्राप्त झालेले अर्ज पुढील निवड प्रक्रियेसाठी ग्राहय धरण्यात येणार नाहीत, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

तसेच आणखी असे की, उपरोक्त संदर्भीय परिपत्रकानुसार ज्या अध्यापकांनी संचालक, राष्ट्रीय सेवा योजना या पदासाठी अर्ज केलेले आहेत, त्यांनी पुन:श्च ऑनलाईन अर्ज करण्याची आवश्यकता नाही. परंतु ऑनलाईन अर्ज केला आहे आणि त्याची हार्ड कॉपी विद्यापीठ कार्यालयास जमा केली नाही, अशा अध्यापकांनी वरील कालावधीमध्ये ऑनलाईन अर्जाची हार्ड कॉपी व आवश्यक कागदपत्रे जमा करावीत.

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
**कुलसचिव**

**संदर्भ क्र.: शिवाजी वि. /आस्थापना पी.जी./**649
**दिनांक :-** 26 MAY 2026
**सोबत : वरील प्रमाणे.**

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी -

१) अधिविभागप्रमुख / संचालक / समन्वयक,
सर्व अधिविभाग / प्रशाळा (स्कूल) / केंद्र / अध्यासने,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

२) शिवाजी विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था.
यांनी कृपया सदरचे परिपत्रक सर्व शिक्षकांच्या निदर्शनास आणावे.

RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ४, अंक १३० (४)] बुधवार, ऑक्टोबर १०, २०१८/आश्विन १८, शके १९४० [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

### असाधारण क्रमांक ३६१

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक १० ऑक्टोबर २०१८

**अधिसूचना**

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६.**

क्रमांक परिनि. २०१८/प्र.क्र.८६/विशि-२.— महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (२०१७ चा महा. ६) याच्या कलम २३ च्या पोट-कलम (२) च्या खंड (क) तसेच कलम ७२ च्या पोट-कलम (१०) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, याच्या वित्तलब्धी, पदावधी आणि सेवेच्या अटी व शर्ती यांच्याशी संबंधित पुढीलप्रमाणे एकरूप परिनियम विहित करीत आहे :—

**२०१८ चा एकरूप परिनियम क्रमांक २**

१. **संक्षिप्त नाव.**— या परिनियमास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, याच्या वित्तलब्धी, पदावधी आणि सेवेच्या अटी व शर्ती ) एकरूप परिनियम, २०१८, असे म्हणावे.

२. **नामनिर्देशन प्रक्रिया.**— कुलगुरू, पात्र इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागवील आणि त्यांच्यामधून एका योग्य व्यक्तीला, संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, म्हणून तीन वर्षांच्या पदावधीकरिता, जो आणखी एका मुदतीसाठी नवीकृत करता येईल-नामनिर्देशित करील .

या बाबत मूळ महाविद्यालय किंवा मूळ मान्यता प्राप्त परिसंस्था किंवा मूळ विद्यापीठ सदर पदावर प्रतिनियुक्त झालेल्या व्यक्तिच्या जागी दुसऱ्या व्यक्तिची नेमणूक त्या त्या वेळी अस्तित्वात असलेल्या निकषानुसार करू शकेल.

३. **वित्तलब्धी.**— संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, म्हणून नामनिर्देशित केलेली व्यक्ती, संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, म्हणून तिचे नामनिर्देशन केल्याच्या दिनांकास तिच्या पूर्वीच्या सेवेत असताना तिला जितकी वित्तलब्धी व वेतनमान मिळत असेल तितकी वित्तलब्धी व वेतनमान मूळ महाविद्यालय किंवा मूळ मान्यताप्राप्त परिसंस्था किंवा मूळ विद्यापीठ या कडून मिळण्यास हक्कदार असेल.

४. **वय.**— संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, या पदाच्या नामनिर्देशनासाठी इच्छुक असलेल्या उमेदवाराचे वय हे नामनिर्देशनाच्या वेळेस ५० वर्षांपेक्षा जास्त असणार नाही.

**५. सेवेच्या अटी व शर्ती.**— (१) संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, याच्या सेवेच्या अटी व शर्ती ह्या, त्याच्या मूळ पदाच्या अटी व शर्तींप्रमाणेच असतील आणि संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, म्हणून त्याच्या पदावधीदरम्यान त्याला अहितकारक होईल अशा प्रकारे त्या बदलता येणार नाहीत.

(२) संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, म्हणून नामनिर्देशन झाल्यावर, त्याच्या मूळ कायम पदावर त्याने घेतलेले अंतिम वेतन संरक्षित केले जाईल.

(३) संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, म्हणून नामनिर्देशित झालेल्या व्यक्तीचा, नामनिर्देशनापूर्वी तिने धारण केलेल्या कायम पदावर धारणाधिकार असेल आणि त्या पदाच्या सेवेच्या अटी व शर्तींनुसार ती तिच्या मूळ पदावरून सेवानिवृत्त झाल्याप्रमाणे असेल.

(४) संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, हा थेट कुलगुरूंच्या पर्यवेक्षणाखाली व नियंत्रणाखाली काम करील.

(५) संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, यास, कुलगुरूला उद्देशून, एक महिन्याची नोटीस देऊन, आपल्या पदाचा लेखी स्वरुपात त्याच्या स्वाक्षरीने राजीनामा देता येईल आणि कुलगुरूने त्याचा राजीनामा स्वीकारल्यावर किंवा उक्त नोटिशीचा कालावधी समाप्त झाल्याच्या दिनांकापासून, यांपैकी जे अगोदर घडेल तेव्हापासून, त्याचे आपले पद धारण करण्याचे बंद होईल.

(६) संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, यास, कुलगुरूकडून एक महिन्याची लेखी नोटीस देऊन त्याच्या पदावरून कार्यमुक्त करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सिद्धार्थ खरात,**
शासनाचे सहसचिव.

## HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya
Mumbai 400 032, Dated the 10th October 2018

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PUBLIC UNIVERSITIES ACT, 2016.

No. Parini. 2018/C.R.86/Vishi-2.— In exercise of the powers conferred by sub-section (*10*) of section 72 read with clause (a) sub-section (*2*) of section 23 of the Maharashtra Public Universities Act, 2016 (Mah. Act. No. VI of 2017), the Government of Maharashtra hereby, prescribes the following Uniform Statute relating to emoluments, tenure and terms and conditions of service of the Director of National Service Scheme, namely :—

**UNIFORM STATUTE NO. 2. OF 2018.**

1. *Short title.*— This Statute may be called the Maharashtra Public Universities (Emoluments, Tenure and Terms and Conditions of Service of the Director of National Service Scheme) Uniform Statute, 2018.

2. *Procedure for Nomination.*— The Vice-Chancellor shall invite applications from the eligible aspiring candidates and shall nominate a suitable person as the Director of National Service Scheme from amongst them for a tenure of 3 years, which may be renewed for one more term.

The parent college or parent recognized institution or the parent university, in such case, shall be eligible to appoint the substitute person during the deputation period as per the prevailing norms.

3. *Emoluments.*— The person nominated as the Director of National Service Scheme shall be entitled to receive the parent college or parent recognized institution or the parent university, the same emolument and pay-scale which he was drawing in his previous service on the date of nomination as the Director of National Service Scheme.

4. *Age.*— Age of the candidate aspiring the nomination to the post of Director of National Service Scheme at the time of nomination shall not be more than 50 years.

5. *Terms and Conditions of Service.*— (1) Terms and conditions of service of the Director of National Service Scheme shall be the same as the terms and conditions of service of his original post and shall not be altered to his disadvantage during his tenure as the Director of National Service Scheme.

(2) *On nomination as the Director of National Service Scheme, the pay* last drawn by him on his original substantive post shall be protected.

(3) The person nominated as the Director of National Service Scheme shall hold a lien on the substantive post held by him prior to the nomination and he shall stand retired from his original post in accordance with the terms and conditions of service of that post.

(4) The Director of National Service Scheme shall work directly under the supervision and control of the Vice-Chancellor.

(5) The Director of National Service Scheme may, by writing under his signature addressed to the Vice-Chancellor, after giving one month's notice resign from his office and shall cease to hold his office on the acceptance of his resignation by the Vice-Chancellor or from the date of expiry of the said notice period, whichever is earlier.

(6) The Director of National Service Scheme may be relieved from his office by the Vice-Chancellor by giving one month's notice in writing.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SIDHHARTH KHARAT,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD.